कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ च्या सुधारीकरणास व आधुनिकीकरणासाठी महानिर्मिती कंपनी मर्यादित यांना प्राप्त झालेल्या कर्जाच्या रक्कमेच्या समायोजनाबाबत वित्तीय वर्ष २०१७-१८

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. निधिवि-२०१७/प्र.क्र.-११२/(६) भाग (३)ऊर्जा-३
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३१ मार्च , २०१८

संदर्भ : - १) शासन परिपत्रक वित विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दि. १८/४/२०१७
२) शासन परिपत्रक वित विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून, २०१७
३) शासन परिपत्रक वित विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ०८ ऑगस्ट, २०१७
४) शासन परिपत्रक वित विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ०६ फेब्रुवारी, २०१८
५) शासन परिपत्रक वित विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.५६/अर्थ-३, दि. १७.०३.२०१८
६) शासन निर्णय क्र. निधिवि-२०१७/प्र.क्र.-११२/ऊर्जा-३ दि.१६.०२.२०१८
७)शासन निर्णय क्र. निधिवि-२०१७/प्र.क्र.-११२/ (३) /ऊर्जा-३ दि. मार्च २०१८
८) शासन परिपत्रक वित विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.५६/अर्थ-३, दि. १७.०३.२०१८
९) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. MD/MSPGCL/GOM/No.३०४६ दि. .

प्रस्तावना : -

कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प संच क्र. ६ (सुधारीकरण व आधुनिकीकरण) जागतिक बँकेच्या सहकार्याने उभारण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरिता मागणी क्र. के-११ मुख्यलेखाशिर्ष ६८०१०६४७ अंतर्गत रु. ८० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. जागतिक बँकेकडून सन २०१७-१८ मध्ये कर्ज रुपाने संदर्भिय शासन निर्णय क्र.६ अन्वये रु. २०,३३,७७,४५७/- , क्र.७ अन्वये रु.९६,१६,०००/-, अशी एकूण रक्कम रु.२१,२९,९३,४५७/- पेकी रु. ९६,१६,०००/- शासनाच्या एकत्रित निधीत जमा झाली आहे. व रु. २०,३३,७७,४५७/- इतकी कर्जाची रक्कम थेट प्रकल्प राबविणाऱ्या महानिर्मिती कंपनीस परस्पर प्राप्त झालेली आहे. आता जागतिक बंकेडून महानिर्मिती कंपनीस परस्पर प्राप्त झालेली कर्जाची रक्कम रु. ४,९२,७२,६७४/-.पुस्तकी समायोजनाने योग्य त्या लेखाशिर्षा खाली दर्शविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

महानिर्मिती कंपनीच्या कोराडी युनिट क्र. ६ (आधुनिकीकरण व नुतनीकरण) प्रकल्पास केंद्र शासनाच्या पुढाकाराने जागतिक बँकेकडून मंजूर झालेल्या कर्जापैकी सन २०१७-१८ मध्ये जागतिक बँकेडून महानिर्मिती कंपनीस परस्पर प्राप्त झालेली कर्जाची रक्कम रु ४,९२,७२,६७४/-.(चार कोटी ब्याण्णव लाख बाहतर हजार सहाशे चो-याहतर फक्त) इतकी रक्कम पुस्तकी समायोजनाने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली कर्जाची रक्कम ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आली आहे त्याच कारणासाठी उपयोगात आणली जाईल याची खातरजमा करावी.

३. वरील बाबींचा खर्च "मागणी क्र. के-११ ,६८०१ वीज प्रकल्पासाठी कर्जे, २०५ पारेषण व वितरण, (००) (००) (०५) कोराडी ऊर्जा प्रकल्पासाठी महानिर्मिती कंपनीस कर्जे (६८०१०६४७) ५५ कर्जे व आगाऊ रक्कमा" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदी मधून समायोजित करण्यात यावा.

४. सदर रक्कमेचे पुस्तकी समायोजन महालेखापाल मुंबई यांच्या अखत्यारित व अधिकारात करण्यात येत असल्याने या रक्कमेचे देयक तयार करण्यात येवू नये.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ यांनी त्यांच्या अखत्यारित व अधिकारात रु ४,९२,७२,६७४/-.(चार कोटी ब्याण्णव लाख बाहतर हजार सहाशे चो-याहतर फक्त) इतक्या रक्कमेचे पुस्तकी समायोजन करुन शासनास तसे कळवावे.

६. महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१७/ परिपत्रक क्र. अर्थसंकल्प, २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ या परिच्छेदांची पूर्तता होत आहे व परिशिष्ट मधील सर्व १ ते १० अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच दि. ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकानुसार सदर खर्च ८०% च्या मर्यादेत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०३३१२०४०३३७२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e344470b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9fd195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2018.03.31 20:40:52 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत -:

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विदयुत सुत्रधारी कंपनी मर्यादित, हाँगकाँग बिल्डींग , ४ था मजला.एम ,जी,रोड . फोर्ट, मुंबई-२३

३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.

४) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई-४०००२०.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपूर.

६) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधान सभा, विधानभवन, मुंबई

७) अधिदान व लेखा अधिकारी, (अराप / रालेवि-१), मुंबई.

८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

९) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१३/साधनसंपत्ती /साऊ/ व्यय-१६/ऋण व हमी कक्ष)मंत्रालय, मुंबई, ३२

१०) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.